# शिक्षण मंडळाचा एमएस-सीआयटी अभ्यासक्रम

लोकमत

(१४-०१-२०१० : १:१७:४०)

**पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) : शिक्षण मंडळाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढावी यासाठी मंडळातर्फे काही नव्या योजना आखण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शिक्षण मंडळाच्या इयत्ता सातवीमधील फक्त विद्यार्थीनींसाठी एमएससीआयटी या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा संगीता तिवारी यांनी येथे दिली.**

शिक्षण मंडळाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी शिक्षण मंडळातर्फे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी शिक्षण प्रमुख रामचंद्र जाधव, मंडळाचे उपाध्यक्ष विजय रेणूसे आदी उपस्थित होते.

तिवारी म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता आणि पटसंख्या वाढण्यासाठी मंडळाकडून प्रयत्न केले जात आहे. भौतिक सुविधांमध्ये आम्ही काहीसे कमी आहोत. मात्र लवकरच त्यावरही मात करण्यासाठी प्रयत्न केले जातील. इयत्ता सातवी नंतर शाळा सोडणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यातही विद्यार्थीचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे इयत्ता सातवीमधील विद्यार्थीनींसाठी एमएससीआयटी हा अभ्यासक्रम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. सध्या सात ते आठ ठिकाणी हा अभ्यासक्रमाला प्रथम सुरुवात करण्यात येईल. इयत्ता सातवीमध्ये ५ हजार ७० इतकी मुलींची संख्या आहे. मंडळाच्या दहा विभागांमधील प्रत्येक एक-एक कॉम्प्युटर्स लॅबमध्ये तो सुरु करण्यात येईल.

यासाठी काही संस्थांनी पुढाकार घेतला आहे. या अभ्यासक्रमाबाबत चर्चा सुरु असून यासाठी महापालिकेचीही मदत घेण्याचा आमचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंडळाच्या एकूणच कारभारात पारदर्शकता आणण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. मात्र यापुढील काळात विद्यार्थ्यांना जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गणवेश मिळावेत, यासाठी आमचे निश्चित प्रयत्न राहतील. गणवेश खरेदीची प्रक्रिया यावेळी निविदा मागवून करण्यात येईल. मंडळामध्ये नक्कीच कमतरता आहे. मात्र त्यावर मात केली जाईल. मंडळाच्या कारभाराबाबत नेहमीच आक्षेप घेतले जातात. त्यातील प्रामुख्याने गणवेश खरेदी प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार होतात, असे सांगितले जाते. मात्र खासगी शाळांकडूनही ठराविकच दुकानांमधून खरेदी केली जाते. त्यावेळी काही स्वयंसेवी संस्था त्यांना का जाब विचारत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.